नियमीत दिवाणी दावा क्रमांक ५६/२०२१
निशाण क्रमांक ७२ / क

प्रतिवादी तर्फे साक्षीदार क्रमांक २

| | | |
|---|---|---|
| नाव | - | प्रसाद दत्तात्रय दड्डीकर |
| वय वर्षे | - | ३७ वर्षे |
| व्यवसाय | - | दस्त लेखनिक |
| राहणार | - | गडहिंग्लज, ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर |

प्रतिवादी तर्फे वकील बी. बी. घाटगे यांचे मार्फत सरतपास सुरु

१. मी २००७ पासून गडहिंग्लज येथे दस्त लेखनिक म्हणून काम करतो. मी केलेला दस्त मला दाखविल्यास तो मी ओळखू शकतो. मला आता निशाणी क्रमांक ६४ वरील दस्त दाखविला. सदरील दस्त लिहण्याकरीता माझ्याकडे परशराम काशाप्पा कांबळे व संतोष तानाजी सारंग हे आले होते व साक्षीदार म्हणून सुनिल संभाजी सारंग, जोतीराम मारुती पोवार, सतिश तानाजी सारंग व शिवप्रसाद शिवमूर्ती स्वामी हे आले होते. सदरील दस्तातील माहिती ही मला परशराम काशाप्पा कांबळे यांनी सांगीतली. त्यांनी सांगीतल्याप्रमाणे सदरील दस्त मी टंकलिखीत केला. दस्त टंकलिखीत झाल्यानंतर सदरील दस्त दोन्ही पक्षकारांना, साक्षीदार व ओळखदार याच्या समक्ष वाचून दाखविला. सदरील दस्त वाचून दाखविल्यानंतर त्या दस्ता मध्ये एक वाक्य हस्तलिखीत घेण्यात आले. तो मजकूर परशराम कांबळे यांनी सांगीतला. त्यानंतर त्यांनी दस्तातील मजकूर बरोबर असल्याचे कथन केले व स्वाक्षरी केली. त्यांनी लिहून देणार या रकान्यामध्ये तसेच जेथे हस्तलेखन करण्यात आले तेथे देखील स्वाक्षरी केली. त्यावर माझी व साक्षीदार, ओळख देणार यांची स्वाक्षरी व अंगठे आहेत. सदरील दस्तातील मजकूर बरोबर आहे. तो दस्त निशाणी क्रमांक ६४ वर आहे.

सरतपास पूर्ण.

वादी तर्फे वकील एस के. नंदगावे यांचे मार्फत उलट तपास सुरु

२. मी पदवीधर आहे. सन २००७ मध्ये माझे कार्यालय गडहिंग्लज कचेरी मध्ये होते. माझे स्वताचे कार्यालय सन २००७ मध्ये सुरु झाले. माझे आजोबा, काका, वडील हे दस्त लेखनाचे काम करीत होते. माझे वडील सन २०१३ साली मयत झाले. मुद्रांक खरेदीची नोंद होते परंतु दस्त तयार केलेची नोंद करत नाही. निशाणी क्रमांक ६४ वरील दस्त संगणकावर मी तयार केलेला आहे यासाठी माझ्या तोंडी पुराव्याशिवाय दुसरा पुरावा नाही. संतोष तानाजी सारंग यांनी यापूर्वी माझ्या सोबत किंवा माझ्या कार्यालया मध्ये कुठलाही दुसरा व्यवहार केलेला नाही. संतोष यांची ओळख पक्षकार म्हणून माझी त्याच दिवशी झाली. परशराम काशाप्पा कांबळे यांनी यापूर्वी माझ्या सोबत किंवा माझ्या कार्यालया मध्ये कुठलाही दुसरा व्यवहार केलेला नाही. परशराम यांची ओळख पक्षकार म्हणून माझी त्याच दिवशी झाली. दस्त करण्यापूर्वी साधारणता मागील ३ महिन्याचे सात बारा उतारे जोडावे लागतात. हे म्हणणे बरोबर आहे की, दस्ता सोबत जोडण्यात आलेले सात बारा हे तीन महिन्याच्या आतील नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, सन २००७ ला ऑन लाईन उतारे मिळत होते. निशाणी क्रमांक ६४ सोबत जाडलेला एक सात बारा संगणीकृत सात बारा आहे. हे मला सांगता येत नाही की, त्याप्रमाणे तीन महिन्यातील मुदतीतील सात बारा काढण्यास अडचण नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, ख-या नोंदी दुय्यम निबंधक याच्या समक्ष येवू नयेत म्हणून मी जुने उतारे सादर केलेले आहेत. मला सात बारा कळतो. सात बारा वरील पिक सदरी नोंदी, मालकी सदर्भातील नोंदी व इतर हक्कातील नोंदी बाबत मला माहिती आहे.

३. सात बारा मध्ये बोजाची नोंद असल्यास त्याचे नाहरकत प्रमाणपत्र जोडावे लागते. सात बारा मध्ये विहीरी बाबत बोजा म्हणून नोंद आहे. विहीरीच्या बोजा बाबत नाहरकत प्रमाणपत्र खरेदी दस्तासोबत जोडलेले नाही. बँकेचा बोजा नसल्यामुळे तसे प्रमाणपत्र घेण्यात आलेले नाही. बोजा असले बाबत खरेदीपत्रात नमूद केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, बोजा असताना देखील व संतोषशी

संगणमत करुन चुकीचे खरेदीपत्र केलेले आहे. तुकडा पडत असेल तर व्यवहार करता येत नाही परंतु सह हिस्सेदार किंवा लगतदार असल्यास करता येते. वादातील जमीन बागायत आहे. सन २०१६ साली २० गुंठयाच्या वर असल्यास खरेदीपत्र करता येते. हे म्हणणे बरोबर आहे की, वादातील व्यवहार हा केवळ ३ आर. क्षेत्रा संदर्भातील आहे. हे म्हणणे बरोबर आहे की, खरेदी पत्रासोबत सक्षम अधिकारी यांचे प्रमाणपत्र जोडलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, तुकडा पडत असताना देखील खोटा दस्त बनवून दुय्यम निबंधक यांचेकडे नोंदविला आहे. हे म्हणणे खरे नाही की, संतोष सारंग याची मिळकत दस्तातील मिळकतीच्या लगत नाही. प्रकाश पाटील दस्त लेखनिक आहेत. जोतीराम मारुती पोवार हा त्याच्याकडे कामाला असतो. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही एकाच व्यवसायात असल्यामुळे आमचे नेहमी उठणे बसणे असते. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे चुकीचे सात बारा उतारे जोडून खोटे खरेदीपत्र केलेले आहे.

४. वादातील जमीन गावा लगत आहे का हे मला सांगता येत नाही. गावा लगत असल्याबाबतची नोंद मला सात बारा उता-या मध्ये दिसली नाही. ३ आर. च्या चतुसिमा दर्शविणारा कुठलाही कागद दस्ता सोबत नाही. हे म्हणणे खरे नाही की, चतुसिमा या सारंग याच्या सांगण्याप्रमाणे लिहल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, तुकडे जोड तुकडे बंदी कायदयाचा भंग करुन वादातील दस्त बनविलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, संतोषला मदत करण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास संपला.

फेरतपास नाही.

वा.दा.का.दा.

श्रवणोत्तर स्विकृत

दिनांक ११/०९/२०२५

सही/-

( न. श्री. पुरी )
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर,
गडहिंग्लज